महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
दरपत्रक सूचना क्र.०६ /२०२६

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील मा.पीठासीन अधिकारी व दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्त होणारे अधिकारी/कर्मचारी, या सचिवालयात नव्याने नियुक्त होणारे अधिकारी व कर्मचारी, पदोन्नतीने वरिष्ठ पदावर नियुक्त होणारे अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन ओळखपत्र पुरविण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. त्याकरिता संबधित पुरवठादार /व्यक्ती यांनी दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यामधुन **मा.सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई** या पत्त्यावर दिनांक ६ नोव्हेंबर, २०२६ पूर्वी किंवा त्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवावे. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी उघडण्यात येतील.

अ.क्र.	कामाचा तपशिल	सर्व करासहित दर
१.	मुद्रीत ओळखपत्र, ओळखपत्र होल्डर, 'महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय असे मराठी व इंग्रजीमध्ये मुद्रित केलेली लेस (एकत्रितरित्या)	
२.	ओळखपत्र होल्डर (अतिरिक्त)	
३.	महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय असे मुद्रित केलेली लेस (अतिरिक्त)	
४.	मुद्रीत ओळखपत्र,'महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय असे मराठी व इंग्रजीमध्ये मुद्रित (एकत्रितरित्या क्यूआर कोड रहीत) (सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी)	

अटी व शर्ती :-

१. ओळखपत्र तयार करण्यासाठी या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून भरून घेण्यात आलेली वैयक्तिक माहितीचे फॉर्म उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने सदरहू माहिती टंकलिखित करण्याचे (डेटा एकत्रित करण्याचे) काम संबंधित ठेकेदारामार्फत करण्यात येईल.

२. ओळखपत्रामध्ये क्यूआरकोडचा समावेश असावा तसेच या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांनी विहीत नमून्यात भरून दिलेली सर्व माहिती (सोबत जोडलेल्या फॉर्मप्रमाणे) ओळखपत्रावरील क्यूआर कोड स्कॅन केल्यावर दृष्टीपथास पडावी.

३. या सचिवालयाचे **महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** असे नाव मराठी व इंग्रजीमध्ये मुद्रित केलेली गळयात घालावयाची लेस प्रत्येक ओळखपत्रासोबत पुरविण्यात यावी. तसेच ओळखपत्रावर होलोग्राम लावण्यात यावा.

४. ओळखपत्राकरिता कोणत्या वस्तुंचा / साधनांचा वापर करण्यात येणार आहे याचा तपशील दरपत्रकासोबत जोडावा तसेच सोबत जोडलेल्या फॉर्ममधील माहितीप्रमाणे एक नमुना ओळखपत्र तयार करून ते दरपत्रकासोबत सादर करावे.

५. ओळखपत्रावरील अधिकारी / कर्मचारी यांचे छायाचित्र तसेच अन्य माहिती सुस्पष्ट असावी.

६. देयक निधी उपलब्धतेप्रमाणे देण्यात येईल. देयक अदा करण्यास कोणत्याही अडचणीमुळे विलंब झाल्यास व्याज आकारता येणार नाही.

७. निविदाकाराने जी.एस.टी.चे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जी.एस.टी.ची नोंदणी नसेल तर निविदा उघडता येणार नाही.

८. एक वा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार सचिव-४ यांनी राखून ठेवलेले आहेत.

९. दरपत्रकात आपली कोणतीही अट मान्य केली जाणार नाही.

सचिव-४
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय